# My NIRMAN Story: Adwait Dandwate

THE LOGICAL INDIAN

# "All Of Us Want Clean City, But Not Those Who Clean It" This Couple From Jalgaon Left Their Jobs To Educate

Aditya Minocha Maharashtra
July 12th, 2019 / 12:24 PM



Link: https://thelogicalindian.com/my-social-responsibility/vardhishnu-clean-city-maharashtra/









# वंचितांचे आनंदघर

*जळगाव शहरातील कचरा वेचक मुलांच्या शिक्षणासाठी अव्दैत व त्याचे मित्र वर्धिष्णू – सोशल रिसर्च & डेव्हलपमेंट सोसायटी या संस्थेच्या माध्यमातून 'आनंदघर' नावाचे एक सायंकाळचे केंद्र चालवतात. तसेच जळगावातील काही शाळांसोबत शाळाबाह्य मुलांना शाळेच्या मुख्य प्रवाहामध्ये कसे आणता येईल, याबद्दलही तो काम करत आहे. वाचूया त्याच्या या प्रवासाबद्दल...*

वर्धिष्णू- सोशल रिसर्च & सोसायटीने सप्टेंबर महिन्यात घेतलेल्या सर्वेक्षणात कचरा वेचून आयुष्य जगणाऱ्या एकूण ३९६ लोकांना माहिती विचारण्यात आली. ३९६ पैकी ११६ चौदा वर्षांखालील मुले होती. यातील ८५ % हून अधिक मुले शाळेत कधी गेलीच नव्हती, अथवा १ली-२री शिकून त्यांनी शाळा सोडली होती. याचमुळे वर्धिष्णूने जळगावमधील तांबापुरा या कचरावेचकांची सर्वाधिक संख्या असणाऱ्या भागात आम्ही सायंशाळा सुरु केली. सर्वच मुले असंघटीत कामगारांची असून त्यांना मुलांना अक्षर आणि अंक ओळख करून देणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे. मात्र हे करतानाच स्वच्छतेचे महत्व पटवून देणे व मूल्य शिक्षण यावर भर देण्यात येतो आहे.

शिकण्याची आणि शिकवण्याची प्रक्रिया आनंददायी करण्याच्या उद्देशाने सुरु झालेल्या या उपक्रमाला 'आनंदघर' हे नाव दिले होते. कामाचा आवाका वाढत जात असताना, फक्त कचरा वेचकच नाहीत तर शाळाबाह्य मुलं/मुली देखील यात सामील होत गेले. गेल्या ४ वर्षात तांबापुरातील ५० हून अधिक मुलं/मुली या सगळ्या प्रक्रियेतून गेली. तर सध्या ४५ मुलं दररोज या केंद्रात शिकत आहेत. जळगावातील इतर भागातील मुलांपर्यंत पोहोचायचे या हेतूने मार्च २०१७ ला तंट्या भिल्ल वस्तीत 'आनंदघराचे' दुसरे केंद्र सुरु करण्यात आले. आज तिथे सुमारे ३० मुलं/मुली दररोज शिकत आहेत.






आता ३० ऑक्टोबर रोजी वर्धिष्णूने समता नगर भागात 'आनंदघराचे' तिसरे केंद्र सुरु केले आहे. समता नगर हा सुमारे १०,००० लोकसंख्येची वस्ती असलेला भाग. लोकांचा मुख्य व्यवसाय म्हणजे हातमजुरी. घोषित वस्ती असल्याने समतानगरमध्ये सिमेंटचे पक्के रस्ते आहेत. पिण्याचे पाणी तसेच शौचालय देखील आहेत. बहुसंख्य मुले शाळेत जातात पण ८ वी नंतर गळतात. १ लीत दाखल होणाऱ्या मुलांपैकी १०% पेक्षा कमी मुले ८ वीच्या पुढे जातात. लिहिता-वाचता न येणं हे शाळा सोडण्याचं प्रमुख कारण. याव्यतिरिक्त मुलं कामाला लागतात तर मुलींची लग्न होतात. यामुळे शिक्षणाचे प्रमाण कमीच आहे. याठिकाणी वर्धिष्णूला एक खोली मिळाली असून, तिथेच हे केंद्र सुरु झाले आहे. अगदी पहिल्या दिवसापासून सुमारे ३० मुलं/मुली इथे शिकायला येत आहेत.

वर्धिष्णूच्या तीनही केंद्रावर मिळून शिकणाऱ्यांची संख्या आता १०० च्या पुढे गेलेली आहे. अक्षर व अंक ओळख, तसेच आरोग्य व व्यसन या मुख्य विषयांवर 'आनंदघरात' काम सुरु आहे.

अद्वैतला त्याच्या या कामासाठी Wipro Seeding Programme for Educational CSOs (Civil Service Organisations) यांची फेलोशिप पण मिळाली आहे. फेलोशिपअंतर्गत आर्थिक मदतीसोबतच अझीम प्रेमजी युनिवर्सिटी, अझीम प्रेमजी फाउंडेशन मधून मदत, प्रशिक्षण, mentorship मिळेल. शिक्षण क्षेत्रातील नवीन संस्थांची पुढील ३ वर्षात आर्थिक घडी नीट बसवणे आणि त्यांच्या कामाची व्याप्ती वाढवणे, हा फेलोशिपचा मुख्य उद्देश आहे.

शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना स्वतःची फेलोशिप सुरु करण्यास सक्षम करावे या हेतूने Teach For INDIA ने TFIx या उपक्रमाची सुरुवात केली आहे. TFIx च्या मदतीने २०१९ साली वर्धिष्णू स्वतःच्या फेलोशिप सुरु करता येतील.

अद्वैतला त्याच्या या कामाबद्दल सयाजीराव गायकवाड विद्यापीठ, बडोदा (गुजराथ) तर्फे आयोजित 'युगंतर - २०१८' या राष्ट्रीय युवा परिषदेत 'Unsung Heroes' या श्रेणीत शिक्षण क्षेत्राचा मानाचा पुरस्कार देखील मिळाला आहे.

**अद्वैत दंडवते, निर्माण ४**
adwaitdandwate@gmail.com



# पैसा म्हणजे करिअर कुणी ठरवलं?

**चार भिंतीत कोंडून स्वत:साठी पैसा कमावणं याचीच खरं तर भीती वाटली पाहिजे...**



वयाच्या तेविसाव्या वर्षी, नोकरी न करता पूर्णवेळ सामाजिक प्रश्नांवर काम करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी मी कंपनी सेक्रेटरीच्या (सीएस) फायनलला होतो आणि पुण्यात असलेली चांगल्या पगाराची नोकरी नुकतीच सोडून जळगावला परत आलेलो होतो. सगळ्यांसाठीच तो एक धक्काच होता. बक्कळ पैसा कमावण्याची संधी देणारी एक चांगली नोकरी आणि शिक्षण मी सोडतोय म्हटल्यावर माझ्या आई-वडिलांव्यतिरिक्त जवळ जवळ सगळ्यांनीच मला मुर्खात काढलं होतं. (काही अजूनही काढतात!)

सामाजिक प्रश्नांवर काम करण्याचा निर्णय मी घेतला तेव्हा मला त्यातल्या फायदा-तोट्यापेक्षाही कामात मिळणारं समाधान जास्त महत्त्वाचं वाटलं. आत्मकेंद्री आयुष्य झुगारुन जेव्हा तुम्ही समाजात मिसळता तेव्हा तो समाज खुल्या दिलाने तुम्हाला स्वीकारतो. तुमच्या अडचणी, तुमची दु:खं फक्त तुमच्या एकट्याची राहत नाहीत, त्यांना वाहून घेणारे असंख्य हात तुमच्या जोडीला उभे असतात. मग फायदा-तोटा तुम्हाला पैशात मोजताच येत नाही. आज सुमारे ७ वर्षे झाली मी सामाजिक क्षेत्राशी जोडलेलो आहे. पण मी सीएस सोडलं याचं मला अजिबात वैषम्य नाही, उलट फक्त पैसा, स्पर्धा आणि सत्तेच्या दुष्टचक्रात मी अडकून पडलो नाही याचा मला आनंदच आहे. आज फक्त शनिवार-रविवारी मिळणाऱ्या सुटीची वाट पाहत सोमवार ते शुक्रवार काम ओढायचं असं करणारे असंख्य तुम्हाला मिळतील. पण सामाजिक प्रश्नावर काम करताना तुम्हाला दिवसाचं, वारांचं, तारखेचं महत्त्वच राहत नाही. येणारा प्रत्येक दिवस तुमच्यासाठी नवीन काहीतरी घेऊन येतो, तुम्हाला नवीन काहीतरी शिकवून जातो. तुमचं जगणं समृद्ध करुन जातो. हा एकप्रकारे फायदाच नाही का?

**अद्वैत दंडवते,** निर्माण ४

(अद्वैत त्यानेच सुरु केलेल्या 'वर्धिष्णू' या संस्थेमार्फत जळगावमधील कचरा वेचणाऱ्या मुलांच्या शिक्षणासाठी काम करतो.)

# अद्वैत दंडवते

मुक्काम : जळगाव
काम : कचरा वेचणाऱ्यांसाठी
काम करता करता
त्यांच्या मुलांसाठी शाळा चालवणं.

माझं पदवीपर्यंत शिक्षण कॉमर्समधून झालं. 'सीएस' (कंपनी सेक्रेटरी) करताना फायनलच्या आधी मी पुण्यातील एका नामांकित कंपनीत लागलो. कॉर्पोरेट जीवनात सेटल होत असतानाच जीवनाच्या दुसऱ्या बाजूचं दर्शन मला झालं. सतत चालणारा भ्रष्टाचार, जीवघेणी स्पर्धा आणि स्वत:चं अस्तित्व वाचवण्यासाठी जीवघेणी धडपड या सगळ्याचा मला त्रास व्हायला लागला. आयुष्यात जी मूल्यं आणि तत्त्व जपण्याचा थोडाथोडका प्रयत्न मी करत होतो त्याच्यापासून मी दूर जातोय, असं माझ्या लक्षात यायला लागलं आणि नोकरी सोडून मी जळगावला परत आलो.

माझ्या मनातील प्रश्नांची उत्तरं शोधण्याचा प्रयत्न करत असतानाच जळगावला डॉ. अभय बंग यांचं 'या जीवनाचं काय करू?' हे भाषण ऐकलं. माझ्याच मनातील प्रश्न ते त्यांच्या भाषणातून मांडताएत असं वाटलं. याच ठिकाणी मी 'निर्माण'शी जोडलो गेलो.

यानंतर मी पुणे विद्यापीठातून समाजशास्त्रात एम. ए. केलं. सामाजिक प्रश्नांवर काम करत असताना फक्त भावनिक आवाहन न करता परिस्थितीचा सखोल अभ्यास करुन सांख्यिकी स्वरुपात वस्तुस्थिती लोकांसमोर मांडायची व तो प्रश्न सोडवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करायचे या कल्पनेतून मी, माझी पत्नी प्रणाली तसेच मित्र सुशील अशा तिघांनी 'वर्धिष्णू- सोशल रिसर्च अँन्ड डेव्हलपमेंट सोसायटी'ची स्थापना केली.



या संस्थेमार्फत पहिला विषय आम्ही हाती घेतला तो म्हणजे कचरावेचकांचा. शहरातील लोकांना त्यांचं घर, रस्ते साफ तर हवे असतात मात्र हे साफ कोण करतं याविषयी त्यांना फारसं घेणं-देणं नसतं. त्यांना कचरापेटीत आकंठ बुडालेला एखादा छोटा मुलगा पाहून वाईट तर वाटतं; पण कोण हे लोक? कसे जगत असतील हे? काय प्रश्न भेडसावत असतील यांना? आपण २ मिनिटंदेखील सहन करु शकत नाही अशा घाणीत आणि वासात कसे काम करत असतील हे? असे प्रश्न त्यांना पडत नाहीत.

कचरावेचकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करुन घेण्यासाठी प्रयत्न करायचे असतील तर सर्वप्रथम त्यांची सामाजिक आर्थिक परिस्थिती समजून घ्यायला हवी. याच उद्दिष्टानं आम्ही वर्धिष्णूच्या माध्यमातून जळगावातील महानगरपालिका कर्मचाऱ्याव्यतिरिक्त



कचरा वेचून आयुष्य जगणाऱ्या लोकांचे सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण केलं. यावरुन मिळालेल्या माहितीच्या आधारे शिक्षण, आरोग्याचे प्रस्न तसेच व्यसनं व रोजगार या मुद्यांवर काम करण्यास सुरुवात झाली. याअंतर्गत कचरावेचकांची तसेच एकूण असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांची जास्त लोकसंख्या असलेल्या जळगावातील तांबापुरा या भागात मुलांसाठी आम्ही सायं-शाळा सुरु केली. आज या शाळेत सुमारे 30 मुलं-मुली शिकत आहेत. ही सर्व कचरावेचक अथवा कचरावेचकांची तसेच या परिसरात राहणाऱ्या असंघटित कामगारांची मुलं आहेत. यापैकी बहुतांश मुलं ही एकतर शाळा सोडलेली किंवा कधीही शाळेत न गेलेली आहेत.

पुढील काळात संघटनेच्या माध्यमातून कागदी व कापडी पिशव्या तयार करणं, कागदाच्या लगद्यापासून वह्या तयार करणं ही कामं लवकर सुरु होतील.

कुष्ठरोग्यांच्या बाबतीत बाबा आमटे नेहमी 'गिव्ह देम चान्स, नॉट चॅरिटी' असं म्हणायचे. कचरावेचकांसोबत काम करताना त्यांच्यावर उपकार म्हणून काम न करता त्यांना आत्मसन्मानानं आणि स्वाभिमानानं आयुष्य जगता यावं म्हणून आम्ही प्रयत्न करत आहोत.

हळूहळू आमच्या कामाची सुरुवात होत आहे. उद्दिष्टांबाबत स्पष्टता येत आहे. अनेक लोकांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही एक एक पाऊल टाकत आहोत. धडपडत आहोत. परत उठून चालायला शिकत आहोत. स्पर्धा, पैसा आणि सत्ता यांच्या पलीकडे सामाजिक बांधिलकी असलेलं अर्थपूर्ण आयुष्य जगण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहोत.

संपर्क
dwaitdandwate@gmail.com